# २००० नंतरची कविता
# स्वरूप आणि आकलन



संपादक सहसंपादक
डॉ. मारोती कसाब डॉ. अनिल मुंढे

2021-2022

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय मनोगत | डॉ. मारोती कसाब<br>डॉ. अनिल मुंढे | ०६ |
| ०२. | प्रस्तावना | प्राचार्य डॉ. वसंत बिरादार | ०८ |
| ०३. | '२००० नंतरची मराठी कविता' | प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव | १७ |
| ०४. | "प्रकाशपर्वाचा साक्षीदार असलेली उजेडाची कविता" | डॉ. युवराज मानकर | २६ |
| ०५. | कवी भाऊ भोजने यांचा 'निळा प्रक्षोभ' | डॉ. शत्रुघ्न जाधव | ४० |
| ०६. | 'संदर्भ शोधताना' कवितासंग्रहातील कवितांमधून येणाऱ्या सामाजिकत्तेचा अभ्यास | प्रा.उन्मेष शेकडे | ५० |
| ०७. | स्त्री साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी आणि २००० नंतरच्या कवयित्रीच्या कवितेतील आत्मभान | प्रा. गौतम गायकवाड | ५७ |
| ०८. | गावगाड्याचा बदलता अवकाश शब्दबद्ध करणारा काव्यसंग्रह: 'बोलावे ते आम्ही' | डॉ.सुरेश शिंदे | ७३ |
| ०९. | सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा काव्यसंग्रह : आरंभबिंदू | डॉ. पंजाब शेरे | ८० |
| १०. | विषमतेविरूद्ध बंड पुकारणारी कविता: 'आता क्रांती दूर नाही' | डॉ. संतोष चंपती हंकारे | ८८ |
| ११. | जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा | प्रा. गोरोबा शेषराव रोडगे | ९७ |
| १२. | २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील भाकरीचे प्रश्न | डॉ. राजेश धनजकर | १०२ |
| १३. | २००० नंतरच्या कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण | डॉ. रामकिशन दहिफळे | ११० |
| १४. | २००० नंतरच्या ग्रामीण कवितेचे बदलते स्वरुप | डॉ. संजय खाडप | ११९ |

BN No. 978-81-953976-4-8

विता : स्वरूप आणि आकलन

ाऊस
ावसार चौक,
– ४३१ ६०५.
७

ार, नांदेड.
७

ोव्हेंबर २०२१
ा फुले महाविद्यालय, अहमदपूर
ाडे
राजेश उंबरकर

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय मनोगत | डॉ. मारोती कसाब<br>डॉ. अनिल मुंढे | ०६ |
| ०२. | प्रस्तावना | प्राचार्य डॉ. वसंत बिरादार | ०८ |
| ०३. | '२००० नंतरची मराठी कविता' | प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव | १७ |
| ०४. | "प्रकाशपर्वाचा साक्षीदार असलेली उजेडाची कविता" | डॉ. युवराज मानकर | २६ |
| ०५. | कवी भाऊ भोजने यांचा 'निळा प्रक्षोभ' | डॉ. शत्रुघ्न जाधव | ४० |
| ०६. | 'संदर्भ शोधताना' कवितासंग्रहातील कवितांमधून येणाऱ्या सामाजिकतेचा अभ्यास | प्रा.उन्मेष शेकडे | ५० |
| ०७. | स्त्री साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी आणि २००० नंतरच्या कवयित्रीच्या कवितेतींल आत्मभान | प्रा. गौतम गायकवाड | ५७ |
| ०८. | गावगाड्याचा बदलता अवकाश शब्दबद्ध करणारा काव्यसंग्रह: 'बोलावे ते आम्ही' | डॉ.सुरेश शिंदे | ७३ |
| ०९. | सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा काव्यसंग्रह : आरंभबिंदू | डॉ. पंजाब शेरे | ८० |
| १०. | विषमतेविरूद्ध बंड पुकारणारी कविता: 'आता क्रांती दूर नाही' | डॉ. संतोष चंपती हंकारे | ८८ |
| ११. | जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा | प्रा. गोरोबा शेषराव रोडगे | ९७ |
| १२. | २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील भाकरीचे प्रश्न | डॉ. राजेश धनजकर | १०३ |
| १३. | २००० नंतरच्या कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण | डॉ. रामकिशन दहिफळे | ११० |
| १४. | २००० नंतरच्या ग्रामीण कवितेचे बदलते स्वरुप | डॉ. संजय खाडप | ११९ |

# २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील भाकरीचे प्रश्न


प्रा. डॉ. राजेश धनजकर

संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी


आदिवासी हा या भूमीचा मूळ मालक. हजारो वर्षापासून तो इथल्या जंगल-पहाडात व दऱ्याखोऱ्याच्या भूभागात वास्तव्य करताना दिसतो. आजही त्याने आपले घनदाट अरण्यातील पूर्ण वास्तव्य सोडलेले नाही. त्यामुळे तो आधुनिक विकास व सोयी-सुविधापासून कोसो दूर आहे. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत व त्यानंतर काही काळ अदिवासी समाज हा अरण्यवासीच होता. जंगल हेच त्याने आपले सर्वस्व मानले होते. परंतु १९७०-८० च्या दशकात मात्र आदिवासी माणसाला थोडे आत्मभान आले. खेडोपाडी व ग्रामीण भागात आश्रम शाळांची स्थापना झाली. आदिवासी समाजाची तुरळक मुले त्यावेळी आश्रमशाळेत जाऊ लागली. शाळेबरोबर जेवणाचीही व्यवस्था होते, हे पालकांना अधिक महत्वाचे वाटे. त्यामुळे तेही शाळेत पाठवण्यास तयार होत असत. पुढे-पुढे आदिवासी विद्यार्थी रडतपडत का होईना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊ लागला. त्यातून त्यांना थोडे आत्मभान आले. थोडेबहूत शिक्षण घेतलेल्या सुज्ञ मंडळींना 'स्व' ची जाणीव झाली. त्यांच्या वैचारिक प्रतिभेला धुमारे फुटू लागले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय संविधानाने आदिवासी समाजाला आरक्षणाचे कवचकुंडल प्राप्त झाले. त्यांना अनेक सोयी-सवलती मिळू लागल्या. आदिवासींचा समाज जीवनाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा मार्ग मोकळा झाला. उत्तरोत्तर आदिवासी समाजाला शिक्षणाचे मानवी जिवनातील महत्व पटू लागले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ही समज त्यांच्यात दृढ झाली. प्रस्थापित वर्गात शिक्षणाची गंगा ' धो-धो' वाहत होती, त्याचवेळी आदिवासींच्या, 'वाडी' 'वस्ती' वर तिची गती मात्र अतिशय

संथ होती. हे जरी सगळे सत्य असले तरी त्याच 'वाडी' 'वस्ती' तून शिक्षण घेऊन काही सुशिक्षीत तरुण 'वाडी' बाहेर पडू लागले. नंतर त्यांनी तालुक्याचे ठिकाण गाठले. खऱ्या शिक्षणाची व 'स्व' अस्तित्वाची जाणीव त्यांना तिथेच झाली. आरक्षणाने आपल्याला नोकरीचे दालन खुले असल्याची समज तिथेच आली.

१९८० नंतर आदिवासी तरुणांचा अल्प प्रमाणात का होईना नोकरीत प्रवेश झाला. पण खेदाची बाब ही की, त्या वेळी आदिवासी मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण मात्र अतिशय निराशाजनक होते. त्यामुळे त्यांचा नोकरीत शिरकाव होऊ शकला नाही. आनंदाची गोष्ट एवढीच की, आदिवासी तरुणांनी आपली नोकरी सांभाळून 'वाचन संस्कृती' कडे लक्ष्य दिल्यामुळे त्यांच्या मनाच्या कक्षा रुंदावल्या. वाचनाच्या सातत्यामुळे त्यांनाही आपल्या समाजाच्या व्यथा आणि वेदनांची जाणीव झाली. आदिवासींचे दु:ख आणि दारिद्रय पाहून व अनुभवून हाही वर्ग अस्वस्थ व्हायचा. विचाराचे चक्र गतिमान होऊ लागले. वाचनातील सातत्यामुळे त्यांना साहित्याचा परिचय झाला. अनेक साहित्य प्रकार व प्रवाहांमधील दु:ख, दारिद्रय, उपासमार, शोषण, पिळवणूक, अन्याय-अत्याचार त्यांच्या वाचण्यात आले. आदिवासी-मधला सुज्ञ वाचक अस्वस्थ झाला. आदिवासींचे जगणे यापेक्षा वेगळे नसल्याची त्याला जाणीव झाली. त्यामुळे आपल्याही समाजाचे अनंत प्रश्न व समस्या आपण साहित्याद्वारे मांडले पाहिजेत, अशी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधली आणि खऱ्या अर्थाने इथूनच आदिवासी तरुण लिहिता झाला.

आज आदिवासी साहित्यिकांच्या एकूण साहित्याचा विचार केला, तर त्यात 'कविते' चे दालन अधिक समृध्द केल्याचे निदर्शनास येते. परंतु त्यामाने कथा, कांदबरी, नाटक, चरित्र व आत्मचरित्र या साहित्य प्रकाराकडे तो फारसा वळाल्याचे दिसत नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी कवींच्या कवितांचाच थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसे पाहिले तर, आदिवासी समाजातील ज्या-ज्या कवींनी काव्याच्या प्रांतात उडी घेतली. त्या सर्वच कवींवर फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा फार मोठा

पगडा असल्याचे दिसते. कारण त्यांच्या विचार व प्रेरणांचा संबंध हा आपल्या जीवन जाणिवांशी आहे, म्हणून त्यांनी आंबेडकरी विचार हे परिवर्तनाचे शस्त्र माणून काव्यलेखन केले. वाहरु सोनवणे, बाबाराव मडावी, तुकाराम रोंगटे, संजय लोहकरे, सुरेश धनवे, सखाराम डाखोरे, शीतल ढगे, प्रकाश गारोळे, पांडुरंग वागतकर, सोपान भुरके, शंकर बळी, दशरथ मडावी, पी. डी. आत्राम, कविता आत्राम, सनील कुमरे, विनायक तुमराम असा काही आदिवासी कवींचा वर्ग काव्याच्या प्रांतात पाय रोऊन उभा आहे.

आंबेडकरी विचारांचा वारसा लाभलेल्या आदिवासी कवींनी आपल्या समाजावर होत असलेले अन्याय-अत्याचार, शोषण, उपासमार, दारिद्रय, कष्ट, दु:ख, भूक आणि भाकर यासारखे अनंत विषय तेवढयाच पोटतिडकीने मांडले आहेत. आदिवासींचा मूळ प्रश्न आहे तो भाकरीचा भाकरीच्या एका-एका तुकड्यासाठी जंगल-पहाडात टाहो फोडणारी व तडफडणारी माणसे आदिवासी कवींच्या कवितेने हेरली आहेत.

**" पाखरांचे थवे माझे**
**निघाले भाकरीच्या शोधात**
**ही कोणती बेबंदशाही**
**जीवाचे हाल या देशात"1**

स्वातंत्र्य् प्राप्तीनंतरही या देशाच्या मूळ मालकाचे भाकरीच्या तुकडयासाठी एवढे हाल व्हावते, ही कवीची शोकांतिका आहे. हा कोणता देश आहे, की ज्या देशाने आदिमांचे जीवन जगणे असहय करुन टाकले. दऱ्याखोऱ्यातल्या व जंगल पहाडातल्या आदिवासी माणसांचे थवेच्या थवे भाकरीच्या शोधासाठी पायपीट करत आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी धडपडत आहेत, ही धडपडच कवीला अस्वस्थ करते.

**" साहेब,**
**भरल्या पोटाने कधी क्रांती होत नाही**
**झोप येते स्वप्न पडतात**
**जेव्हा पोटाला भूक लागते ना**

तेव्हा माणूस तळमळतो तडफडतो
अन डोळे भाकरीच्या दिशा शोधतात

क्रांती घडून येण्यासाठी माणसाचे पोट रिकामे असावे लागते. इथे तर भरल्या पोटाने लोक क्रांतीची भाषा करतात. या धनदांडग्यांना भरल्यापोटी झोप जरुर येईल, सुखाची स्वप्नेही पडतील. परंतु त्यांच्या हातून क्रांती होणार नाही. जो भूकेने व्याकूळ आहे, भाकरीविना तळमळतो-तडफडतो त्यांच्याच जिभेवर क्रांतीची भाषा खेळते. तेच क्रांती करु शकतात. कवयित्री अशाच भूकेने तडफडणाऱ्या आदिम बांधवाना क्रांतीसाठी सज्ज होण्याचे आवाहन करते.

**या देशात पोटासाठी पोट येते**
**पोटाच्या भुकेसाठी कमरेखालची भूक भाग घेते**
**कोण आहे तो**
**भाकरीवर भाषण देतो**
**भाकर भाकर म्हणत**
**भाकरीवरच कर लावतो**
**आता 'भ' भटजीचा नसून**
**भाकरीचा झालाय**
**'क' कांद्याचा अन**
**'र' रिकाम्या पोटाचा" 2**

आदिवासींच्या जीवनातले दु:ख आणि दारिद्रय त्यांना कुठल्या थरापर्यंत नेऊन सोडेल, याचा काही नेमच नाही. हे ' पोटासाठी पोट येते' या चरणावरुन आपल्या सहजच लक्षात येते. जी माणसे धनाढय आहेत. ज्यांच्याकडे गडगंज संपत्ती आहे. अशा मस्तवाल लोकांची पोटाची भूक सहजच भागविली जाते. आणि तीच माणसे 'भूक आणि भाकरी' वर भाषणं ठोकतात. भरभरुन बोलतात पण भाकरीचा प्रश्न काही केल्या ते सोडवू शकत नाहीत. कारण वासनेची भूक शमविण्यासाठी त्यांना कमरेखालची भूक हवी असते. कवयित्री अशाच लबाड, फसव्या व ढोंगी लोकांवर शब्दाचे आसूड ओढते. हजारो वर्षे

येथील बहुजनांना व स्त्रियांना छेळणाऱ्या 'मनुवादी संस्कृती' चा कवयित्री या ठिकाणी धिक्कार करते. 'भ' भटजीला मुळासकट उपटून त्या जागी भाकरीचे बिजारोपण करते. तसेच रिकाम्या पोटाला कांदा अन भाकरीची किती आवश्यकता आहे, हेही पटवून देते.

"पोटाची आग विझविण्यासाठी
भाकर लागते भाकर ......
कोणत्याही जातीची ....
आणि ती कष्टाने मिळते
नशिबाने नाही" 3.

माणसाच्या भूकेला जातीपातीची बंधने अजिबात नसतात, तर पोटाची भूक भागविण्यासाठी भाकरीचीच गरज असते. मग ती भाकर कोणत्याही जातीतल्या माणसाची असो, तिने भूकेचा आगडोंब शांत करता येतो. अशी भाकरी ही कष्टानेच मिळविलेली असते. कवीचा इंथे नशिबावर नाही, तर आपल्या कष्टावर व मेहनतीवर प्रचंड विश्वास आहे. कारण कवीला या ठिकाणी फुकटाची भाकरी नको आहे, तर ती 'स्व' कष्टाच्या घामाची हवी. आणि म्हणूनच कवीने नशिबाला लाथाडून कष्टाला मिठी मारली. तसा आदिवासींचा आणि जंगलाचा फार घनिष्ठ संबंध. तो जंगलाच्या सानिध्यातच वाढला व त्याचा विकास झाला. याच रानावनातील चारं, बोरं, कारं, वाळकं आदी रानमेंव्यांनी आदिवासी पोरांची भूक शांत व्हायची. काही काळ त्यांच्या भूकेचा प्रश्न तिथेच मिटायचा.

"रानावनात फिरताना
गोळा केलेली कंदमुळे
ढोरं बांधल्यावर भाजताना
भूकेला कोंब फुटायचे
रानमेव्यावर पोसलेला देह
चावी हमींद खरपुडीसारखा
भुकेल्यांच्या पोटामधली

थोडी तरी भूक भागवील?" 4

जंगल-जिव्हा्यातल्या फळाफुलांवर व कंदमुळांवर आदिवासी पोरांचा देह पोसल्याची कबुली कवी या ठिकाणी देतो. एकूणच काय तर आदिवासींचे वास्तव्यच मुळात अतिशय घनदाट अरण्यात असते. त्यामुळे तेथील 'रानमेवा' त्यांना सहजच उपलब्ध होतो. आदिवासींच्या पोटाची संपूर्ण भूक भागविली जात नसली, तरी भूकेची तिव्रता मात्र थोडी कमी करता येऊ शकते, यावर कवीचा विश्वास आहे.

"काबाडकष्ट अंगमेहनत
रानावनात देशी-विदेशी
जिच्यासाठी गाळला जातो घाम
ती असते शिळीपाती भाकर....

कव्हा सहजच अंग मेहनतीने
कव्हा लांडी लबाडी, चोरीनेही
उघडया नागडयांच्या खळगीसाठी
नाविलाजाने मिळवतो माणूस
ती असते शिळीपाती भाकर" 5.

चार घास सुखाचे मिळावेत म्हणून आदिवासी माणसाला ढोर मेहनत करावी लागते. काबाडकष्ट करावे लागतात. रानावनात वणवण भटकंती करावी लागते. एका-एका भाकरीच्या तुकडयासाठी त्याला परप्रांतात जाऊन घाम गाळावा लागतो, तेव्हा कुठेतरी भाकरीचा कोरकुटका त्याच्या पदरी पडतो. आजही ऊस तोडणे, कापूस वेचणे, कांदे काढणे, मिरच्या तोडणे आदी कामासाठी आदिवासींचे थवेच्या थवे वाडी-वस्तीच्या बाहेर पडल्याचे निदर्शनास येतात.

तसे भाकरी मिळविण्याचे अनेक मार्ग कवीने सांगीतले. परंतु आदिवासी माणूस हा कष्टाच्या भाकरीलाच प्राधान्य देताना दिसतो. त्याला घामातून मिळविलेल्या भाकरीनेच शांत झोप येते आणि यदाकदाचित अन्य मार्गाने कुणी भाकरी मिळविलीच, तर त्यात त्यांचा दोष नाही तर येथील प्रस्थापित

व्यवस्थेचा आहे. त्यामुळेच तर भूकेचा प्रश्न अजूनही आदिवासी समाजाला छळताना दिसतो. अगदी अलीकडच्या काळात आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रचार-प्रसार बऱ्यापैकी झाला आहे. समाजाबरोबर भूकेचे चटके सहन करुन अनेक तरुणांनी शिक्षण घेतले. त्यातील काहींची वैचारिक प्रगल्भता वाढली. अशा काही जाणकारांनी लेखनीची तलवार हातात घेऊन भूक-भाकरीचा फडशा पाडला. पोटाच्या भूकेबरोबर त्यांना ज्ञानाची भूक महत्वाची वाटू लागली.

"आम्हा भूक लागावी
ज्ञानाची पुस्तकी पानाची
एक भाकर कमी खाऊ
पण शाळेला रोज जाऊ
पुस्तकाचे पंख लेऊ
गगन भरारी घेऊ"6.

पोटाची भूक शमविण्यासाठी भाकरीची जेवढी आवश्यकता असते. तेवढीच, किंबहुना त्याहूनही अधिक भूक ज्ञानाची लागावी अशी कवयित्रीने या ठिकाणी अपेक्षा व्यक्त केली. कारण आदिवासींच्या जीवनात भाकरीएवढेच महत्व पुस्तकाला आहे, हे कवयित्री जाणतात. एक वेळ भाकर नाही मिळाली तरी हरकत नाही, परंतु पुस्तकांचा साठा मात्र तुमच्याकडे असायलाच हवा. कारण पुस्तके ही काळाच्या विशाल समुद्रातून वाहून नेणारी फार मोठी जहाजे होत. ती तुमच्याकडे संग्रही असणे जरुरीचे आहे. त्याशिवाय तुम्हाला उच्च स्थानी किंवा वेगवेगळया क्षेत्रात भरारी मारताच येणार नाही, हे कवयित्रीचे म्हणणे अगदी रास्त आहे. आज देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असला, तरी या देशाने येथील मूळनिवासींच्या मूलभूत गरजांची पुर्तता अद्यापही केलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. कुपोषणाचे प्रमाण म्हणावे तर तेही कमी झाले नाही. आदिवासी विकास योजनांचा अजूनही बट्ट्याबोळ आहे. आदिवासी आश्रमशाळांची अवस्था दयनीय आहे. □ट्रॉसिटीचा कायदा असूनही आदिवासींवर अन्याय-अत्याचार होतच आहेत. समाजातल्या